**राज्यात विविध बांधकामासाठी कृत्रिम वाळूचा (M-SAND) वापर करण्याकरीता धोरण निश्चित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः गौखनि-१०/०३२५/प्र.क्र.८०/ख-२,**
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २७ ऑक्टोबर,२०२५

**वाचा**:- १ सुधारित वाळू निर्गति धोरण-२०२५, शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.गौखनि-१०/०१२५/प्र.क्र.०५/ख-१,दि.०८.०४.२०२५
२. दिनांक १३.०५.२०२५ रोजी मा. मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आलेला निर्णय
३. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम २०१३

**प्रस्तावना :-**

नैसर्गिक वाळूसाठी कृत्रिम वाळू किंवा एम-सॅन्ड ही सर्वात योग्य पर्यायी असल्याने एम-सँडला प्रोत्साहन देण्यासाठी दिनांक २३.०५.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. सदर धोरणाच्या योग्य प्रकारे व तात्काळ अंमलबजावणी होण्याच्या अनुषंगाने धोरणातील एम सॅण्ड युनिटसाठी प्रोत्साहन यामध्ये सुधारणा करण्याची बाब विचाराधीन होती. याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय:-**

"राज्यातील विविध बांधकामासाठी कृत्रिम वाळूचा (M-SAND) वापर करण्याकरीता धोरण निश्चित करणेबाबत" या विषयाबाबत शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक गौखनि-१०/ ०३२५/ प्र.क्र.८०/ख-२, दिनांक २३.०५.२०२५ मधील परिच्छेद क्रमांक ०७ अनुक्रमांक (iii) व (iv) खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहेत:-

**०७. एम-सँड युनिट्ससाठी प्रोत्साहन:-**

(iii) प्रत्येक जिल्ह्यामध्ये प्रथम पुढाकार घेणाऱ्या ५० महाराष्ट्र राज्याचा अधिवास असणाऱ्या/ महाराष्ट्रात नोंदणी असणाऱ्या संस्था/इत्यादीना एम-सँड युनिट स्थापन करण्यासाठी उद्योग विभागाच्या व या विभागाच्या सवलती लागू राहतील. तथापि, जिल्ह्यातील भौगालिक परिस्थिती व प्राप्त अर्जांची संख्या विचारात घेवून जिल्हाधिकारी यांना प्रति जिल्हा ५० च्या मर्यादेत वाढ करता येईल.

(iv) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ च्या नियम ९ मध्ये "लिलावाव्दारे खाणपट्टा मंजूर करण्याची रीत" नमूद करण्यात आलेली आहे. त्या कार्यपध्दतीनुसार शासनाकडे किंवा कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे निहित असलेल्या कोणत्याही जमिनीचा लिलाव करताना केवळ एम-सँड युनिट उभारण्यासाठी व त्यामधून उत्खनन करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचा अधिवास असणाऱ्या/महाराष्ट्रात नोंदणी असणाऱ्या संस्था/इत्यादीना भाग घेता येईल. तथापि, राज्यात सध्यस्थितीत ज्या संस्थेच्या/व्यक्तीच्या नावे खाणपट्टा मंजूर असून कार्यान्वीत आहे. त्यांना या लिलावासाठी अपात्र ठरविण्यात यावे. अशा शासकीय जमिनीवरील तसेच खाजगी

जमिनीवर एम सँड युनिटकरीता व्यक्ती/संस्था/इत्यादीना पाच ते दहा एकरापर्यंत खाणपट्ट्यासाठी जागा सक्षम प्राधिकारी यांच्याकडून मंजूर करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. अशा व्यक्ती/संस्था यांनी एक वर्षाच्या आत सदर जमिनीवर एम सॅड युनिट कार्यान्वित करणे बंधनकारक राहील.

०२. तसेच परिच्छेद क्रमांक ०७ अनुक्रमांक (ix) नंतर खालीलप्रमाणे सुधारित बाबीचा अंतर्भाव करण्यात येत आहे:-

(x) एम सॅण्ड युनिटधारक यांनी खालील मानकाप्रमाणे एम सॅण्ड उत्पदान करणे बंधनकारक राहील :-

"BSI and Indian Standards (IS) codes viz. IS ३८३:२०१६ - Coarse and fine aggregate for concrete- Specification (Third Revision)२, IS १५४२:१९९२-Sand for plaster-Specification (Second Revision)२, IS २११६:१९८०- Specification for sand for masonry mortars (First Revision)२, IS ४५६:२०००- Plain and reinforced concrete code of practice (Fourth Revision)२ & such other standards as fixed by BSI from time to time and should be suitable for construction activities. Fine particles of less than १५० Microns size shall not be present in excess quantity than the percentage specified in the IS code.

याप्रमाणे असलेल्या मानकांचे पालन संबंधित एम सॅण्ड युनिटधारक यांनी केले नसल्याचे जिल्हाधिकारी याच्या यंत्रणे मार्फत केलेल्या तपासणीत निदर्शनास आल्यास, संबंधित जिल्हाधिकारी यांना, एम सॅण्ड युनिटधारक यांना एम सॅण्ड उत्पादनासाठी दिलेली परवानगी सहा महिन्या करीता निलंबीत करण्याची कार्यवाही करता येईल. तसेच, मानकांचे पालन न करता पुन्हा एम सॅण्ड उत्पादीत केल्याचे निदर्शनास आल्यास जिल्हाधिकाऱ्यांना ही परवानगी कायम स्वरूपाची रद्द करता येईल.

०३. उक्त सुधारित तरतूदीशी संबंधित दिनांक २३.०५.२०२५ च्या शासन निर्णयातील इतर बाबी त्यापुरत्या सुधारीत समजण्यात याव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२५१०२७१८२४१३९३१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANJAY AUDUMBAR DHARURKAR

Digitally signed by SANJAY AUDUMBAR DHARURKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forest Department, 2.5.4.20=637145FD393D6D5C713E94E6DA7BC6BEE23011448B7FC64D138630B9C76AE7A2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FCF7172A73579B34FA622983D8FB647780FBEF1D35A1CA975955EB9193F3F800, cn=SANJAY AUDUMBAR DHARURKAR
Date: 2025.10.27 18:25:54 +05'30'

**(संजय औ. धारूरकर)**
**उप सचिव, महसूल व वन विभाग**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई.
३. मा. विधानसभा अध्यक्ष यांचे खासगी सचिव, विधानमंडळ, मुंबई

४. मा. विधानपरिषद सभापती यांचे खासगी सचिव, विधानमंडळ, मुंबई
५. मा.मंत्री (महसूल) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व मा. मंत्री/मा. राज्यपाल यांचे खासगी सचिव, मंत्रालय मुंबई.
७. सर्व मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य
८. सर्व मंत्रालयीन विभाग
९. सर्व विभागीय आयुक्त
१०. सर्व जिल्हाधिकारी
११. सर्व महामंडळे
१२. सर्व उपविभागीय अधिकारी
१३. सर्व तहसिलदार